दि. ३० डिसेंबर २०२३ रोजी मराठी विभागातील सर्व प्राध्यापकांची सभा स. ११.१५ वा. मराठी विभागात मराठी विभाग प्रमुख व कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. या सभेस खालील प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे (मराठी विभाग प्रमुख) — [signature]
डॉ. बाळासाहेब अनुसे — [signature]
प्रा. हंसराज भांगे — [signature]
प्रा. प्रतिक्षा खराडे — [signature]

विषय क्र.१ — शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या द्वितीय सत्रात आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबरावजी बुट्टेपाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन दि. ९ जानेवारी २०२४ रोजी करण्याचे ठरले.

विषय क्र.२ - दि. १४ जानेवारीपासून सुरु होणाऱ्या मराठी भाषा पंधरवड्यानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांचे व्याख्यान आयोजित करण्याचे ठरले.

विषय क्र.३ - दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी होणाऱ्या मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पत्रलेखन स्पर्धा, शब्दकोडे सोडवा स्पर्धेचे आयोजन करण्याचे ठरले. तसेच काव्यवाचन, निबंध स्पर्धा घेण्याचे ठरले.

विषय क्र.४ - दि. २७ फेब्रुवारी रोजी कवी कुसुमाग्रज यांना अभिवादन करणे. तसेच 'माझे आनंद पर्यटन' या विशेषांकाची निर्मिती करण्याचे ठरले.

विषय क्र.५ - मराठी विभागाची शैक्षणिक सहल आयोजित करण्याचे ठरले.

उपस्थितांनी चर्चेत सहभागी होऊन वरील उपक्रमांचे नियोजन केले. व सभा समाप्त झाली.

[signature]
डॉ. संजय शिंदे
**मराठी विभाग प्रमुख**
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA RAJGURU NAGAR